Maharashtra State Board of
Secondary & Higher
Secondary Education
Kolhapur Divisional Board
Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर - ४१६ ००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/परीक्षा/ 2847
दिनांक :-05/08/2025

प्रति,
मुख्याध्यापक/ प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय,
सातारा/ सांगली/ कोल्हापूर.

**विषय:- जून-जुलै 2025 मध्ये झालेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) परीक्षेच्या गुणपत्रिका व इतर साहित्य वाटपाबाबत...**
**संदर्भ:- क्र.रा.मं./परीक्षा-2/2768 दि.04/08/2025 रोजीचे राज्य मंडळ, पुणे यांचे पत्र**

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, आपल्या माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयामार्फत जून-जुलै 2025 मध्ये झालेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांच्या मूळ गुणपत्रिका आणि तपशिलवार गुण दर्शविणारे शालेय अभिलेख संबंधित वितरण केंद्रावर गुरुवार दि.07/08/2025 रोजी सकाळी 11.00 ते दुपारी 2.00 पर्यंत हस्तपोहोच वाटप करण्यात येणार आहे. तरी सदर दिवशी आपल्या माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाच्या अधिकृत प्रतिनिधीस पत्रासह वितरण केंद्रावर पाठविण्याची व्यवस्था करावी.

सदर सर्व गुणपत्रिका आपल्याच माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या आहेत याची खात्री करावी. अन्य माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका प्राप्त झाल्या असतील तर त्या सिलबंद करुन आपल्या प्रतिनिधीमार्फत त्वरित या कार्यालयाकडे जमा करण्यात याव्यात. तसेच आपल्या माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयातील एखाद्या विद्यार्थ्याची गुणपत्रिका प्राप्त न झालेस दि.14/08/2025 अखेर मंडळ कार्यालयास लेखी कळविण्यात यावे. तद्नंतर काही त्रुटी राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्या माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाची राहील याची नोंद घ्यावी.

मूळ गुणपत्रकात दुरुस्ती (नाव, आडनाव, आईचे नाव) असल्यास शाळांनी मंडळाकडे निकाल वाटप दिनांकापासून एक महिन्याच्या आत परिपूर्ण दुरुस्ती प्रस्ताव दि.08/09/2025 पर्यंत मंडळ कार्यालयात सादर करावेत.

**जून-जुलै 2025 मध्ये झालेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी) परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकांचे वितरण आपल्या माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयात गुरुवार दि.07/08/2025 रोजी दुपारी 3.00 वाजता करण्यात यावे.**

**श्रेणी सुधार योजने अंतर्गत (CIS) प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकांबाबत सूचना -**

1) **जून-जुलै 2025 मध्ये झालेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) परीक्षेस श्रेणी सुधार योजनेअंतर्गत (CIS) प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांनी दि.08/09/2025 अखेर विकल्प देणे अनिवार्य राहिल. तसेच दि.08/02/2026 अखेर जादा शुल्क आकारुन विकल्प स्विकारता येईल. या कालावधीत विकल्प न दिल्यास जून-जुलै 2025 परीक्षेची संपादणूक रद्द करुन पूर्वीच्याच परीक्षेची संपादणूक ग्राह्य धरण्यात येईल. विकल्पाचा नमुना फॉर्म या परिपत्रकासोबत जोडला आहे.**
2) **श्रेणी सुधार योजने अंतर्गत (CIS) प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांनी कनिष्ठ महाविद्यालयाचे शिफारस पत्रासह विकल्प फॉर्म आणि पूर्वीच्या परीक्षेची (इ.12 वी) मूळ गुणपत्रिका मंडळ कार्यालयात हस्तपोहोच सादर केल्यानंतरच जून-जुलै 2025 परीक्षेची मूळ गुणपत्रिका हस्तपोहोच देण्यात येतील याची नोंद घ्यावी.**
3) **विकल्प फॉर्म अथवा पूर्वीच्या परीक्षेची (इ.12 वी) मूळ गुणपत्रिका अभावी कोणत्याही विद्यार्थ्यास जून-जुलै 2025 परीक्षेची मूळ गुणपत्रिका देण्यात येणार नाही अशी स्पष्ट सूचना सर्व विद्यार्थ्यांना देण्यात यावी.**
4) **आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील श्रेणी सुधार योजने अंतर्गत (CIS) प्रविष्ठ झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना जून-जुलै 2025 परीक्षेचा ऑनलाईन निकाल जून्या निकालासोबत तूलना करुन विकल्प फॉर्म भरण्याबाबत सूचना देण्यात याव्यात आणि ज्या विद्यार्थ्यांना जून-जुलै 2025 परीक्षेचा (CIS चा) निकाल स्विकारावयाचा नाही अशा विद्यार्थ्यांकडूनही त्यापध्दतीने विकल्प फॉर्म भरुन घेऊन तो कनिष्ठ महाविद्यालयांनी दि.08/09/2025 अखेर मंडळ कार्यालयात सादर करावा.**

(सुभाष रा.चौगुले)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

प्रत माहितीस्तव:- मा.सचिव, राज्यमंडळ,पुणे- 4

सोबत :- श्रेणी सुधार योजने अंतर्गत (CIS) प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांकरिता विकल्प फॉर्म नमूना

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर
## उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा श्रेणीसुधार योजना विकल्प फॉर्म

मी (विद्यार्थ्याचे/ विद्यार्थीनीचे नाव) ................................................................ जून-जुलै २०२५ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस श्रेणीसुधार योजनेअंतर्गत ........................................................................ या कनिष्ठ महाविद्यालयामार्फत प्रविष्ट होऊन उत्तीर्ण झालो/झाले आहे. माझी **जून-जुलै २०२५** परीक्षेची संपादणुक खालीलप्रमाणे आहे.

बैठक क्रमांक ................................

| अ.क्र. | विषय | संपादन केलेले गुण |
|---|---|---|
| १ | | |
| २ | | |
| ३ | | |
| ४ | | |
| ५ | | |
| ६ | | |
| एकूण गुण | | |
| टक्केवारी | | |

मी यापूर्वी फेब्रु-मार्च/ जुलै-ऑगस्ट .................... च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा .................... ............................................... या कनिष्ठ महाविद्यालयामार्फत प्रविष्ट होऊन उत्तीर्ण झालो/झाले आहे. त्या परीक्षेची संपादणुक खालीलप्रमाणे आहे.

बैठक क्रमांक ................................

| अ.क्र. | विषय | संपादन केलेले गुण |
|---|---|---|
| १ | | |
| २ | | |
| ३ | | |
| ४ | | |
| ५ | | |
| ६ | | |
| एकूण गुण | | |
| टक्केवारी | | |

वरील दोन्ही परीक्षांचा तुलनात्मक विचार करता मी (विद्यार्थ्याचे/ विद्यार्थीनीचे नाव) ................. ................................................. असे लिहून देतो / देते की, माझे फेब्रु-मार्च / जुलै-ऑगस्ट ................ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेतील बैठक क्रमांक .................... अन्वये दिलेल्या परीक्षेतील एकूण गुण व गुणांची टक्केवारी अधिक असल्याने त्या परीक्षेचा निकाल स्वखुशीने स्विकारण्यास तयार आहे.

तसेच फेब्रु-मार्च / जुलै-ऑगस्ट ................ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेतील बैठक क्रमांक .................... अन्वये दिलेल्या परीक्षेतील एकूण गुण व गुणांची टक्केवारी कमी असल्याने त्या परीक्षेची संपादणुक रद्द करण्यास माझी संमती आहे.

विद्यार्थ्यांचे/ विद्यार्थीनीचे नाव -
विद्यार्थ्यांची/ विद्यार्थीनीची स्वाक्षरी -

प्राचार्यांची स्वाक्षरी
कनिष्ठ महाविद्यालयाचा शिक्का

- **सदरचा विकल्प फॉर्मदि.०८/०९/२०२५ अखेर मंडळ कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे.**